**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**BENCH AT AURANGABAD**

**WRIT PETITION NO.14289 OF 2021**
**WITH CA/13629/2021 IN WP/14289/2021**

SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA
VERSUS
THE DISTRICT CONSUMER REDRESSAL FORUM, NANDURBAR
THROUGH ITS REGISTRAR AND OTHERS
...
Advocate for Petitioners : Mr. Rajesh Mewara
AGP for Respondent No.2 – State : Mrs. V. S. Chaudhari
...

**CORAM : NITIN B. SURYAWANSHI, J.**

**DATE : 17th DECEMBER, 2021**

**PER COURT :**

1. The petitioner, who is a regulator i.e. S.E.B.I. has taken over the possession of the property of respondent No.4 – PAN Card Club under the Securities and Exchange Board of India Act, 1992. Respondent No.3 filed proceeding before respondent No.1 – District Consumer Redressal Forum, Nandurbar, seeking recovery of money invested by her in respondent No.4 Club. The petitioner was arrayed as respondent No.5 in the said proceedings. The tribunal has directed refund of the amount invested by respondent No.3 along with interest. The petitioner apprehends execution of the said order.

2. The learned advocate for the petitioner pointed out the observations of the Division Bench of this Court at Principal Seat, in W.P.

::: Uploaded on - 20/12/2021 ::: Downloaded on - 20/12/2021 12:24:00 :::

No.12998/2018 (Exhibit-I), that there are investors in excess of 50 lakhs and recovery roughly around Rs.100 Crores is made and the investors are entitled to receive that amount pari-passu.

The petitioner is not in a position to undertake the exercise of distribution of money, as status quo order is passed at the Principal Seat of this Court. The petitioner has, therefore, made out a prima facie case for grant of ad-interim relief.

3. Issue notice for final disposal to the respondents, returnable on 27-01-2022. Learned Assistant Government Pleader waives service of notice for respondent No.2.

4. In the meanwhile, there shall be ad-interim relief in terms of prayer clause 'B'.

**(NITIN B. SURYAWANSHI, J.)**

SVH

::: Uploaded on - 20/12/2021 ::: Downloaded on - 20/12/2021 12:24:00 :::

# जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,नंदुरबार.

जा.क्र. जि.ग्रा.त.नि.मं.आस्था लेखा 2870/2021
जि. ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच
प्रशासकीय मार्ग जिल्हा परिषद जवळ
नविन न्यायालयीन इमारतीच्या पाठीमागे
ता.नंदुरबार जिल्हा नंदुरबार
दि. 05/03/2021

मा.अध्यक्ष : श्री.एस.पी.बोरवाल.
मा.सदस्या : श्रीमती बी.पी केतकर,
मा.सदस्य : श्री.एम.एस.बोडस

---

ग्राहक तक्रार क्र. : ४४/२०१९
तक्रार दाखल दि. १२/०७/२०१५
तक्रार निकाली दि. ०१/०३/२०२१

डॉ.पन्ना पदमसी आसर. ------ तक्रारदार
उ.व.६५, धंदा- वैद्यकीय व्यवसाय
रा.मिलल लॅबॉरटरी,पहिला मजला, देसाई पुरा,
पोरवारवाडी जवळ,नंदुरबार,ता.जि.नंदुरबार.

विरुध्द

पॅन कार्ड क्लब लि. -- - सामनेवाले
(Cooperative Identity No-U91900MH1997 PLC105363,Central Govt Incorporation Regn.No.-11/105363)
१११/११३, कालिदास उद्योग भवन,
सेंचुरी बाजार जवळ, प्रभादेवी,मुंबई ४०० ०२५.
द्वारा- चेअरमन व डायरेक्टर

(१) श्रीमती शोभा रत्नाकर बर्डे
उ.व.सज्ञान,धंदा-चेअरमन

(२) श्री.मनीष कालीदास गांधी
उ.व.सज्ञान,धंदा-संचालक
रा.बी/८, जयकुंज अपार्टमेंट, आगाशी क्रॉस रोड,
दळवी हॉस्पीटल वरती, विरार जि.ठाणे ४०१३०३

(३) श्री.रामचंद्र रामक्रिशनन
उ.व.सज्ञान,धंदा-संचालक
रा.६०१, बिल्डींग नं.१ अ, श्री अहिंसाधाम CHS Ltd.न्यु लिंक रोड समोर
मालाड (पश्चिम),मुंबई-४०० ०६४

(४) श्री.चंद्रसेन गणपतराव भिसे
उ.व.सज्ञान.धंदा-संचालक
रा.प्लॉट नं.१४, गोपाळ निवास, रुम नं ४,
पहिला मजला,सायन,(प.),मुंबई ४०० ०२२

भा. प्र. वि. बो. SEBI
सं / No 14005
दिनांक / Date 16 MAR 2021

(४) जनरल मॅनेजर व रिकव्हरी ऑफीसर,
सिक्युरीटी अॅन्ड एक्सेंज बोर्ड ऑफ इंडिया
सेबी भवन,प्लॉट नं.-सी ४/ए, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पुर्व),मुंबई-४०००५१

**न्यायासन**

(मा.अध्यक्ष : श्री.एस.पी.बोरवाल)
(मा.सदस्या : श्रीमती बी.पी.केतकर)
(मा.सदस्य श्री.एम.एस.बोडस)

**उपस्थिती**

(तक्रारदारातर्फे : वकिल श्री.आर.एस.महाले)
(सामनेवाले : गैरहजर)

**निकालपत्र**

(द्वारा : मा.सदस्या- श्रीमती बी.पी.केतकर)

---

(१) तक्रारदार यांनी सामनेवाले यांचेकडे विविध योजनांमध्ये गुंतविलेली रक्कम मागणी करुनही सामनेवालेंनी परत दिली नाही, म्हणून सामनेवाले यांचेकडून सदर रक्कम व्याजासह मिळावी तसेच मानसिक व आर्थिक त्रासापोटी आणि तक्रार अर्जाचे खर्चापोटी रक्कम मिळावी या मागणीसाठी प्रस्तुत तक्रार या मंचात दाखल केली आहे.

(२) तक्रारदार यांची तक्रार थोडक्यात अशी आहे की, तक्रारदार हे वरील पत्यावर रहात असून जेष्ठ नागरीक आहेत. सामनेवाले कंपनीचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून नंदुरबार येथे देखील सामनेवाले हे त्यांचे एजंट मार्फत व्यवसाय करतात. सामनेवाले क्र.१ हे कंपनीचे चेअरमन असून सामनेवाले क्र.२ ते ४ हे कंपनीचे डायरेक्टर आहेत. सबब सामनेवाले कंपनीच्या व्यवहारास सामनेवाले क्र.१ ते ४ हे संयुक्तिक व वैयक्तिकरित्या जबाबदार आहेत.

सामनेवाले यांच्या वतीने त्यांचे एजंट यांनी तक्रारदारास कंपनीच्या विविध योजनांची माहिती देऊन त्यात पैसे गुंतविल्यास त्यावर आर्थिक लाभ मिळणार असल्याचे आश्वासन दिले. सामनेवाले यांच्या कंपनीमार्फत Delight Holiday व New Royal Holiday या योजनेअंतर्गत तक्रारदाराने पैसे गुंतविण्याचे ठरविले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | जमा रक्कम रुपय | योजनेची मुदत | परतावा | मुदत संपण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | Delight Holiday | ५०,४०० - | ६ वर्षे ३ महिने | १,०० ८००/- | २०/०७/२०१८ |
| २ | New Royal Holiday | ५०,४००.- | ९ वर्षे | १,५१ ०००/ | १७/०३/२०२१ |
| ३ | New Royal Holiday | ९००/- | ९ वर्षे | २,७००/- | ०९/०२/२०२१ |

तक्रारदाराने सामनेवाले यांच्या कंपनीस सदर योजनेत गुंतविलेल्या रकमेचे नंदुरबार येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेक दिलेले होते. सदर चेक सामनेवाले कंपनीने वटविले असून तक्रारदारास सभासद करुन घेतल्याबाबत सामनेवाले कंपनीकडून पावती देण्यात आलेल्या आहेत.

वरील नमूद योजनेपैकी पहिल्या योजनेची मुदत संपुष्टात आल्याने, तक्रारदाराने परताव्याची रक्कम मिळणेसाठी कंपनीकडे संपर्क केला असता सामनेवाले कंपनीचे मुंबईचे कार्यालय बंद झाले असल्याचे समजले तसेच सामनेवाले कंपनीची सर्व संपत्ती व बँक खाते SEBI ने जप्त केली असल्याचे समजले. सामनेवाले कंपनीने मुदत संपुनही तक्रारदाराचे पैसे परत केलेले नाहीत. अशा परिस्थितीत तक्रारदारास आता सामनेवाले कंपनीवर विश्वास राहिला नसून उर्वरीत दोन योजनेतील पैसे देखील काढुन घ्यावयाचे आहेत. सबब सदरची तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारदार व सामनेवाले कंपनी दरम्यान योजनेचा करार हा नंदुरबार येथे झालेला असून सामनेवाले कंपनी त्यांचे एजंट मार्फत नंदुरबार येथे देखील व्यवसाय करत असते. तक्रारदाराने इतर कुठल्याही कोर्टात तक्रार दाखल केलेली नाही. तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून तक्रारदाराने SEBI ला सामनेवाले म्हणून सामिल केलेले आहे सबब तक्रारदारांची तक्रार खर्चासह मंजूर करण्यात यावी आणि मुदत संपलेल्या योजनेतील रक्कम द.सा.द.शे. १८ टक्के व्याजासह मिळावी आणि उर्वरीत दोन योजनेतील रक्कम व्याजासह मिळावी तसेच तक्रारीच्या खर्चापोटी रक्कम रु.१०,०००/- आणि शारिरिक व मानसिक त्रासापोटी रु.१०,०००/- सामनेवालेंकडून मिळावेत अशी तक्रारदार यांनी मागणी केली आहे.

(३) तक्रारदार यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ शपथपत्र दाखल केले असून, दस्त ऐवजाचे वर्णन यादी सोबत एकुण ३ कागदपत्रे छायांकीत स्वरुपात दाखल केली आहेत. यात सामनेवालेंनी तक्रारदारास दिलेले योजनेचे सर्टीफिकेट्सचा समावेश आहे तसेच पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

(४) सदर प्रकरणी सामनेवाले क्र.१ ते ४ यांचेविरुध्द या आयोगाने काढलेली नोटीस सदर पत्यावरील घरावर कुलूप असल्यामुळे न बजावता परत आली आहे. त्यामुळे तक्रारदारांच्या विनंती अर्जानुसार सामनेवाले क्र.१ ते ४ यांचे विरुध्द दि.१०/१२/२०१९ रोजीचे मुंबई येथील दैनिक नवराष्ट्र या वृत्तपत्रात आयोगाचे समन्सची जाहिर बजावणी करण्यात आली आहे.

तथापि सामनेवाले क्र.१ ते ४ हे सदर प्रकरणी नेमलेल्या सर्व तारखांना गैरहजर आहेत व त्यांनी स्वतःचा खुलासा दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश आयोगाने नि.क्र.१ वर दि.०३/०२/२०२० रोजी पारित केला आहे.

(५) सदर प्रकरणी सामनेवाले क्र.५ यांनी त्यांचे लेखी म्हणणे रजि.पोष्टाद्वारे आयोगात दि. २४/०६/२०१९ रोजी दाखल केले आहे. त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, तक्रारदार हे सामनेवाले क्र.५ यांचे ग्राहक नाहीत. तसेच सामनेवाले क्र.५ हे तक्रारदारांच्या मागणी प्रमाणे सदरची रक्कम देण्यास जबाबदार नाहीत.

सामनेवाले क्र.५ यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ अॅनेक्सचर A ते H ही कागदपत्रे प्रकरणात दाखल केली आहेत.

(६) तक्रारदार यांचा तक्रार अर्ज, दाखल कागदपत्रे व पुराव्याचे शपथपत्र पाहता तसेच सामनेवाले क्र.५ यांचे लेखी म्हणने व दाखल कागदपत्रे पाहता, सदर प्रकरणी निकालाचे निष्कर्षासाठी आमच्या समोर खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यांची उत्तरे आम्ही सकारण खालील प्रमाणे देत आहोत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| अ | तक्रारदार हे सामनेवाले यांचे ग्राहक आहेत काय ? | : होय. |
| ब | सामनेवाले नं.१ ते ४ यांनी तक्रारदारांना सेवा देण्यात त्रुटी केली आहे काय ? | : होय. |
| क | तक्रारदार हे सामनेवाले नं.१ ते ५ यांचेकडून अनुतोष मिळण्यास पात्र आहेत काय ? | : होय. |
| ड | आदेश काय ? | : अंतिम आदेशाप्रमाणे. |

<u>मुद्दा क्र. अ ते ड ची कारणे व निष्कर्ष</u>

(७) प्रकरणात दाखल कागदपत्रांवरुन तक्रारदार या सामनेवाले क्र.१ ते ४ यांच्या ग्राहक असल्याचे स्पष्ट होत असल्याने तक्रारदार या सामनेवाले क्र.१ ते ४ यांची ग्राहक असल्याचे ग्राहय धरण्यात येत आहे

सामनेवाले क्र.५ SEBI यांनी सामनेवाले क्र.१ ते ४ यांचेवर कारवाई करुन त्यांची सर्व संपत्ती जप्त करुन बँक खात्याचे व्यवहार ताब्यात घेतले असल्याने त्यांना आवश्यक पक्ष म्हणून तक्रारदार यांनी या प्रकरणात सामिल केले असले तरी तक्रारदार व SEBI यांच्यात ग्राहक व सेवा देणार हे नाते सिध्द होत नसल्याने तक्रारदार सामनेवाले क्र.५ यांचे प्रत्यक्ष ग्राहक नाहीत.

(८) आयोगातर्फे सामनेवाले क्र.१ ते ५ यांना नोटीस गेल्यावर फक्त सामनेवाले क्र.५ यांनी त्यांचा लेखी खुलासा व वरीष्ठ न्यायालयाचे न्यायनिवाडे पोष्टाद्वारे प्रकरणात दाखल केले मात्र सामनेवाले क्र.१ ते ४ यांचे विरुध्द वर्तमानपत्राद्वारे जाहीर नोटीस प्रसीध्द केल्यावरही सामनेवाले क्र.१ ते ४ हे आयोगासमोर हजर न झाल्याने सदर तक्रार सामनेवाले क्र.१ ते ४ यांचे विरुध्द एकतर्फा चालविण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

सामनेवाले क्र.५ यांनी त्यांच्या लेखी जबाबासोबत खालील न्यायनिवाडे दाखल केले आहेत.

A) The gauhati co.operative urban bank Ltd Vs Santosh Kumar Tewari & Ors.
The national cons.D so Red.com.Decided on 29/05 1997
B) NCDRC, First Appela No 326/1992
R.Sadanandan Vs Bureau of Indian Standards & Ors.
C) SCDRC Orissa, CD Appeal No.654/1999
SEBI Vs Debendra Rout + 2
D) SCDRC M.P.(Bhopal)Appeal No.2104/2006
Smt.Ritu Bhargava Vs. Godrej Industries Ltd.& Ors.
E) Misc.Application No 251,276,312,335,52 of 2016
Pancard Clubs Ltd. Vs. SEBI

(९) वरील सर्व न्यायनिवाडयांचे वाचन आयोगाने केले त्यावरुन तक्रारदार हे सामनेवाले क्र.५ चे प्रत्यक्ष ग्राहक होत नाहीत हे जरी खरे असले तरी पॅनकार्ड क्लब लि.या कंपनीच्या मालमत्तेचे व्यवहार करण्याचे अधिकार सामनेवाले क्र.५ यांना असल्याचे व आयोगासमोर दाखल असलेल्या The Securities and Exchange Board of India यांनी पारित केलेल्या आदेशावरुन दिसून येते. सदर आदेश दि.०२/०२/२०१६ रोजी पारित झाला असून त्यातील परिच्छेद क्र.३४ मधील या प्रकरणाशी संबंधीत महत्वाचे मुद्दे खाली नमूद केल्या प्रमाणे आहेत.

Paragraph No.34

(b)Pancard Clubs Limited and its directors Sudhir Shankar Morvekar,Shoba Ratnakar Barde, Usha Arun Tari, Manish Kalidas Gandhi, Chandrasen Ganpatrao Bhise and Ramachandran Ramakrishnan shall wind up the existing Collective Investment Schemes and refund through 'Bank Demand Draft' or 'Pay Order', the money collected by the said company under the schemes with returns which are due to its investors as per the terms of offer within a period of three months from the date of this Order and thereafter within a period of fifteen days, submit a winding up and repayment report to SEBI in accordance with the SEBI (Collective Investment Schemes) Regulations,1999 including the trail of funds claimed to be refunded, bank account statements indicating refund to the investors and receipt from the investors acknowledging such refunds.

In case the Company has made refunds, it shall produce the proof for such repayment as directed above and also submit a certificate from Chartered Accountant as directed in sub-paragraph (d)below.

(f)Pancard Clubs Limited and its directors Sudhir Shankar Morvekar, Shoba Ratnakar Barde, Usha Arun Tari, Manish Kalidas Gandhi, Chandrasen Ganpatrao Bhise and Ramachandran Ramakrishnan are restrained from accessing the securities market and are prohibited from buying, selling or otherwise dealing in securities market for a period of 4 years.

(g).....Pancard Clubs Limited and its directors Sudhir Shankar Morvekar, Shoba Ratnakar Barde, Usha Arun Tari, Manish Kalidas Gandhi, Chandrasen Ganpatrao Bhise and Ramachandran Ramakrishnan shall remain restrained from accessing the securities market. and would further by prohibited from buying, selling or otherwise dealing in securities, even after the period of 4 years of restraint imposed in sub-paragraph (f) above, till

all the Collective Investment Schemes of the Company are wound up and all the monies mobilized through such schemes are refunded to its investors with returns which are due to them.

-SEBI would make a reference to the State Government/Local Police to register a civil/criminal case against the Company, its promoters, directors and its managers/persons in-charge of the business and its schemes, for offences of fraud, cheating, criminal breach of trust and misappropriation of public funds.

...-SEBI shall initiate attachment and recovery proceedings under the SEBI Act and rules and regulations framed thereunder against the Company and others responsible.

वरील आदेश पारित होऊन पाच वर्षे उलटल्यावरही सदर कंपनीकडून वयोवृध्द तक्रारदारांना त्यांनी गुंतवणूक केलेली रक्कम अद्याप परत मिळालेली नाही.

तसेच Securities and Exchange Board of India Act 1992 या कायद्याच्या प्रस्तावने नुसार गुंतवणुकदारांचे सरक्षण करणे हा मुख्य हेतू या कायद्याचा आहे.

Preamble :- The Preamble of the securities and Exchange Board of India describes the basic functions of the Securities and Exchange Board of India as "...to protect the interests of investors insecurities and to promote the development of and to regulate the securities market and for matters connected therewith or incidental there to "

त्यामुळे सामनेवाले क्र.५ यांनी तक्रारदार व तक्रारदारा सारख्या Pancard Club च्या सामान्य गुंतवणुकदारांचे हित जोपासण्यासाठी व या कंपनीत झालेल्या घोटाळ्यापासून संरक्षण करण्यासाठी तक्रारदार व इतर गुंतवणुकदारांना योग्य सहकार्य करणे अपेक्षीत असल्याने, तक्रारदारांनी सामनेवालेंकडे गुंतवलेली रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश सामनेवाले क्र.१ ते ४ यांना दिल्यास, सदर आदेशाची पुर्तता करण्यास तक्रारदाराला सहकार्य करण्याची कायदेशीर जबाबदारी सामनेवाले क्र.५ यांचेवर राहील असे स्पष्ट मत या आयोगाचे आहे.

(१०) सबब संपूर्ण परिस्थितीचा बारकाईने विचार करुन खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

(अ) तक्रारदार यांचा तक्रार अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

(ब) सामनेवाले नं.१ ते ४ यांनी वैयक्तिक व संयुक्तिक रित्या, सदर आदेश प्राप्त झाल्यापासून पुढील ४५ दिवसांचे आत.

(१) तक्रारदारांनी सामनेवाले क्र.१ ते ४ यांचेकडे Delight Holiday या योजनेत गुंतविलेल्या रक्कमेची मुदत दि.२०/०७/२०१८ रोजी संपली असल्याने, या योजनेची परतावा रक्कम ₹ १,००,८००/- (रक्कम रुपये एक लाख आठशे मात्र) दि.२०/०७/२०१८ पासून ते संपूर्ण रक्कम देऊन होईपर्यंतचे कालावधीसाठी द.सा.द.शे. ८ टक्के व्याजासह तक्रारदारांना द्यावे.

(२) तक्रारदारांनी सामनेवाले क्र.१ ते ४ यांचेकडे New Royal Holiday या योजनेत गुंतविलेल्या रकमेची मुदत दि.१७/०३/२०२१ रोजी संपणार असल्याने, या योजनेची परतावा रक्कम ₹ १,५१,०००/- (रक्कम रुपये एक लाख एक्कावन हजार मात्र) दि.१७/०३/२०२१ पासून ते संपूर्ण रक्कम देऊन होईपर्यंतचे कालावधीसाठी द.सा.द.शे. ८ टक्के व्याजासह तक्रारदारांना द्यावे.

(३) तक्रारदारांनी सामनेवाले क्र.१ ते ४ यांचेकडे New Royal Holiday या योजनेत गुंतविलेल्या रकमेची मुदत दि.०९/०२/२०२१ रोजी संपली असल्याने, या योजनेची परतावा रक्कम ₹ २,७००/- (रक्कम रुपये दोन हजार सातशे मात्र) दि.०९/०२/२०२१ पासून ते संपूर्ण रक्कम देऊन होईपर्यंतचे कालावधीसाठी द.सा.द.शे. ८ टक्के व्याजासह तक्रारदारांना द्यावे.

(३) तक्रारदार यांना मानसिक व शारीरिक त्रासापोटी एकूण रक्कम ₹ ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) व तक्रार अर्जाचे खर्चापोटी एकूण रक्कम ₹ ३,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार मात्र) द्यावे.

(क) सदर आदेश पारित दिनांक रोजी व नंतरही सामनेवाले क्र.१ ते ४ यांची संपूर्ण मालमत्ता, संपत्ती व बँक खात्याचे व्यवहार सामनेवाले क्र.५ यांच्या ताब्यात असल्यास, उपरोक्त आदेश कलम (ब)(१)(२)(३) यांची प्रथम प्राधान्याने पूर्तता करण्याची जबाबदारी सामनेवाले क्र.५ यांची राहिल.

(ड) सदर आदेशाची प्रथम साक्षांकीत प्रत उभयपक्षकारांना कार्यालयामार्फत नि:शुल्क पाठविण्यात यावी.

नंदुरबार.
दिनांक : ०१/०३/२०२१

| | | |
|---|---|---|
| (श्री.एम.एस.बोडस) | (श्रीमती बी.पी.केळकर) | (श्री.संजय पी.बोरवाल) |
| सदस्य | सदस्या | अध्यक्ष |

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग,नंदुरबार

Certified Copy
REGISTRAR
District Consumer Dispute Redressal Commission, Nandurbar